**JDMVP Honoured with the Award 'Young Achievers Education in Khandesh'.**

लोकमत

लोकमत देश-विदेश जळगाव रविवार, दि. ९ जुलै २०२३ ७

# 'मविप्र' : शिक्षण क्षेत्रात उत्तर महाराष्ट्रातील एक अग्रगण्य नाव

## शैक्षणिक : 'यंग एचिव्हर्स एज्युकेशन इन खान्देश' या पुरस्काराने गौरव






दुबई येथे लोकमत आयोजित इंटरनॅशनल अवॉर्डमध्ये जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारकचे मानद सचिव नीलेश भोईटे यांना 'यंग एचिव्हर्स एज्युकेशन इन खान्देश' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी लोकमतचे एडिटर इन चिफ राजेंद्र दर्डा यांच्यासमवेत सौ. मानसी नीलेश भोईटे, रिझवान साजन अध्यक्ष- डॅन्यूब ग्रुप, अभिनेता स्वप्नील जोशी.



**नीलेश रणजित भोईटे**

मानद सचिव
जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक

'श्रृंखला पायी असू दे मी गीत गतीचे गाईन' या उक्तीप्रमाणे वाटचाल करणाऱ्या व्यक्ती नेहमीच अत्यंत धीरोदत्तपणे आव्हाने स्वीकारुन संकटावर मात करीत आपले ध्येय गाठत असतात. अशाच संयमी धीरगंभीर मितभाषी आणि संघर्षशील व्यक्तींमध्ये समावेश होतो, तो जळगावातील ऐतिहासिक भोईटे गढीचे वारसदार आणि शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीद असणाऱ्या जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सह. समाज मर्यादित अर्थात 'मविप्र' या संस्थेचे मानद सचिव नीलेश रणजित भोईटे या तरुण तडफदार आणि उमद्या युवा नेतृत्वाचा. 'मविप्र' हे उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य नाव आहे. या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण तसेच शहरी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊन सर्वांगिण विकास करावयाचा मानस त्यांनी व्यक्त केला.

वाघिणीचे दूध बहुजन समाजाच्या मुला मुलींनाही मिळाले पाहिजे. बहुजन समाजात शिक्षणाविषयी जनजागृती निर्माण झाली पाहिजे, या उद्देशाने त्र्यंबकराव बापूराव भोईटे (सरकार) कै. मोतीराम पाटील, कै. दौलतराव पाटील, कै. रावजी पाटील आसोदेकर, कै. तुकाराम पाटील ममुराबादकर, कै. वामनराव आनंदराव देशमुख अडावदकर, यांच्यासह अन्य शिक्षणप्रेमी मंडळींनी पुढाकार घेऊन सन १९१७ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी रायफिल्ड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शिक्षण परिषद भरविण्यात आली. त्यातूनच आज शतकोत्तरी वाटचाल करणाऱ्या संस्थेचा जन्म झाला. सध्या नीलेश भोईटे आणि त्यांच्या संचालक मंडळाच्या नेतृत्वाखाली या संस्थेचा वटवृक्ष झाला. आज संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत आहे.

खरंतर नीलेश भोईटे हे जळगावचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सरकार, सांस्कृतिक जीवनाशी समरस झालेल्या भोईटे गढीचे आणि घराण्याचे युवा वारसदार. १९८५ पासून नगरसेवक आणि नंतर विविध समित्यांचे सभापतीपद यशस्वीपणे भूषविलेल्या कै. रणजित भोईटे आणि १९९७ साली नगराध्यक्षपद सांभाळणाऱ्या श्रीमती लताताई भोईटे यांचे पुत्र. मविप्र.चे माजी मानद सचिव ॲड. तानाजीराव भोईटे आणि भोईटे परिवाराचा वसा आणि वारसा अतिशय कणखरपणे पुढे चालवित आहेत. नीलेश भोईटे यांनी संगणक शास्त्रात पदविका संपादन केली आहे. अहमदनगर आणि पुणे येथे त्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांना बुद्धिबळ आणि क्रिकेट या खेळाची मनस्वी आवड असून त्यात यांनी प्रावीण्यही मिळविले आहे. शिवाय मराठा प्रीमियर लिगचे तसेच अन्य क्रीडा स्पर्धांचे प्रायोजकत्वही स्वीकारले आहे.

### नीलेश भोईटेंचा 'लोकमत'कडून सातासमुद्रापार गौरव !

- त्यांची ऑक्युलन्स टेक्नॉलॉजिस ॲण्ड मल्टीट्रेड प्रा. लि. नावाची ई-कॉमर्स संस्था असून सन २००१ पासून पुणे आणि जळगाव या ठिकाणी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट आहेत. त्यांच्या या संघर्षमय जीवन प्रवासात त्यांच्या सहचारिणी सौ. मानसी यांची खंबीर साथ लाभत आहे. त्या उच्च शिक्षित आणि कलासक्त आहेत.
- या दोघांच्या संसार वेलीवर कु. नूपुर आणि कु. मंदिरा या सुकन्यारुपी फुले उमलली आहेत. ध्येय जितके महान, तेव्हा त्याचा मार्गही खडतर असतो हे लक्षात घेऊन मार्गक्रमण करणाऱ्या नीलेश भोईटे यांना लोकमत इंटरनॅशनल अवॉर्डमधील यंग अचिव्हर्स एज्युकेशन इन खान्देश हा अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले. दुबई येथे हा सोहळा नुकताच झाला.